आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र – दुपारी १.३० वाजता

१० ऑक्टोबर २०२३ – मंगळवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन आजपासून मोरोक्कोच्या दौऱ्यावर

- महिला सन्मान बचत प्रमाणपत्र 2023 अंतर्गत 18 लाखांहून अधिक खात्यांमधे मिळून 11 लाख कोटी रुपये जमा

- खाजगी एफएम रेडिओ केंद्रांवरच्या जाहिरात दरांमध्ये 43 टक्के वाढ

- इस्त्राईल - हमास सं◌ंघर्षात बळींची संख्या सोळाशेच्या पुढे / अमेरिका, फ्रान्स, जर्मनी, ब्रिटन आणि इटलीचा इस्त्राईलला पाठिंबा

**आणि**

- आयसीसी क्रिकेट विश्वचषक 2023 मध्ये, इंग्लंड - बांगलादेश सामना धरमशाला इथं सुरु / पाकिस्तानची लढत श्रीलंकेबरोबर आज हैदराबादमध्ये

**<><><><><><>**

केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन आजपासून मोरोक्कोच्या दौऱ्यावर आहेत. आपल्या दौऱ्या दरम्यान त्या माराकेच इथं रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर शक्तिकांत दास यांच्यासह जी-२० देशांचे अर्थमंत्री आणि मध्यवर्ती बँकांच्या गव्हर्नरच्या बैठकीचं सहअध्यक्षपद भूषवतील. जागतिक बँक आणि आंतरराष्ट्रीय नाणेनिधीच्या वार्षिक बैठकीलाही त्या उपस्थित राहतील. या वार्षिक बैठकीला जगभरातले अर्थमंत्री आणि मध्यवर्ती बँकांचे प्रतिनिधी उपस्थित राहतील.

अर्थमंत्री सीतारामन येत्या ११ ते १५ ऑक्टोबर दरम्यान माराकेचमध्ये इंडोनेशिया, मोरोक्को, ब्राझील, स्वित्झर्लंड, जर्मनी आणि फ्रांस या देशांबरोबर द्विपक्षीय बैठका देखील घेतील.

**<><><><><><>**

स्विस बँकेनं भारतीय खातेदारांच्या माहितीचा नवा संच केंद्रसरकारला हस्तांतरित केला आहे. स्वित्झर्लंड आणि भारत यांच्यातली माहितीच्या वार्षिक देवाण-घेवाणीची ही पाचवी फेरी आहे. स्वित्झर्लंडनं एकूण १०४ देशांबरोबर सुमारे ३६ लाख आर्थिक खात्यांच्या तपशीलांची देवाण-घेवाण केली आहे.

स्विस बँकेनं भारताला हस्तांतरित केलेल्या माहितीमुळे भारतीय संस्थांना करचुकवेगिरीचा शोध घ्यायला मदत होणार आहे.

**<><><><><>**

देशभरात महिला सन्मान बचत प्रमाणपत्र 2023 अंतर्गत 18 लाखांहून अधिक खाती उघडण्यात आली आहेत. त्यात 11 लाख कोटी रुपये इतकी रक्कम जमा आहे. महिला सन्मान बचत प्रमाणपत्र ही नवीन योजना यावर्षी 1 एप्रिल पासून सुरु केली असं दूरसंवाद मंत्रालयानं सांगितलं. 2 वर्ष मुदतीची ही योजना 31 मार्च 2025 पर्यंत असून साडेसात टक्के तिमाही चक्रवाढ दराने यामधे व्याज मिळतं. दिल्लीत या योजने अंतर्गत 33 हजारांहून अधिक खाती उघडण्यात आली आहेत असं मंत्रालयानं म्हटलं आहे. त्यात 405 कोटी रुपये इतकी रक्कम जमा आहे.

**<><><><><><>**

संरक्षण मंत्री राजनाथ सिंह सध्या इटलीच्या दौऱ्यावर असून काल त्यांनी इटलीचे संरक्षण मंत्री गुइडो क्रोसेटो यांची भेट घेतली. यावेळी दोन्ही नेत्यांमध्ये संरक्षण क्षेत्रातल्या विविध मुद्द्यांवर द्विपक्षीय चर्चा झाली. संरक्षण आणि औद्योगिक

सहकार्यातल्या संधींवर चर्चा करत उभय देशांमधे यावेळी संरक्षण सहकार्याला चालना देण्यासाठीच्या करारावर स्वाक्षरी झाली. भारतीय स्टार्ट-अप्सला प्रोत्साहन देण्याचं इटालियन संरक्षण कंपन्यांना आवाहन करून यासंदर्भातल्या करारावर देखील या बैठकीत स्वाक्षरी करण्यात आली. दोन्ही नेत्यांनी संरक्षण सहकार्याच्या मुद्द्यांसह प्रशिक्षण, माहितीची देवाणघेवाण, सागरी सराव आणि सागरी सुरक्षा यावरही चर्चा केली. सुरक्षा आणि संरक्षण धोरण, संशोधन आणि विकास, लष्करी क्षेत्रातलं शिक्षण, सागरी क्षेत्र जागरूकता, संरक्षण विषयक माहितीची देवाणघेवाण आणि औद्योगिक सहकार्य आदी मुद्द्यांवरच्या करारांचा यात समावेश असल्याची माहिती सूत्रांनी दिली.

<><><><><>

माहिती आणि प्रसारण मंत्रालयाअंतर्गत सेंट्रल ब्युरो ऑफ कम्युनिकेशन अर्थात केंद्रीय संचार ब्युरोनं खाजगी एफएम रेडिओ केंद्रांवरील जाहिरात दरांमध्ये 7 वर्षांनंतर बदल करत मूळ दरामध्ये 43 टक्के वाढ केली आहे. तसंच श्रोत्यांच्या संख्येप्रमाणे प्रत्येक शहरानुसार या दरामध्ये लक्षणीय वाढ अपेक्षित आहे. त्यामुळे आता एफएमसाठी रेडिओवरील जाहिरातीचे दर हे प्रत्येक 10 सेकंदाकरता 52 ते 74 रुपयांनी वाढणार आहेत. देशात सध्या कार्यरत असलेल्या 400 हून अधिक कम्युनिटी रेडिओ केंद्रांसाठी देखील ही दरवाढ फायदेशीर ठरणार आहे. या दरवाढीमुळे श्रोता-संख्येनुसार आणि शहरानुसार; 106 खाजगी एफएम वाहिन्यांचे जाहिरात दर 100 टक्क्यांनी वाढतील, तर 81 वाहिन्यांच्या दरात 50 ते 100 टक्क्यांनी वाढ होईल. 65 वाहिन्यांच्या दरात 50 टक्क्यांपेक्षा कमी वाढ अपेक्षित आहे.

<><><><><>

आज मानसिक आरोग्य दिवस आहे. मानसिक आरोग्यात सकारात्मक बदल घडवण्याबाबत जागरूकता आणण्यासाठी हा दिवस दर वर्षी १० ऑक्टोबर ला साजरा करण्यात येतो. जागतिक मानसिक आरोग्य दिनाची या वर्षीची संकल्पना “मानसिक आरोग्य हा सार्वत्रिक मानवी हक्क” ही असून याबाबत जनजागृती आणि कृतिकार्यक्रम राबवणं हा उद्देश आहे. १९९२ ला रिचर्ड हंटर यांच्या नेतृत्वाखाली वर्ल्ड फौंडेशन ऑफ मेंटल हेल्थने १० ऑक्टोबर हा जागतिक मानसिक आरोग्य दिन साजरा करावा असं सुचविलं आणि १९९४ ला सर्वप्रथम “जागतिक स्तरावर मानसिक आरोग्य सेवेचा दर्जा वाढवणं” या संकल्पनेसह जागतिक मानसिक आरोग्य दिवस साजरा करण्यात आला.

<><><><><>

इस्राएल आणि पॅलेस्टाईन मधल्या हमास या अतिरेकी संघटनेमध्ये सुरु असलेल्या संघर्षात आतापर्यंत दोन्ही बाजूंनी मृत्युमुखी पडलेल्यांची संख्या १६ शे च्या पुढे गेली आहे. विविध माध्यमांच्या अहवालांनुसार, या युद्धात आतापर्यंत इस्राएलचे 900 पेक्षा जास्त नागरिक मारले गेले, अंदाजे 2 हजार 600 जखमी झाले, आणि डझनावारी नागरिकांना ओलीस ठेवण्यात आलं आहे. तर पॅलेस्टाईनचे अंदाजे 687 नागरिक ठार झाले आणि 3 हजार 726 जखमी झाले आहेत.

इस्राएलनं संपूर्ण गाझा पट्टीला वेढा घालून तिथला अन्न, इंधन आणि जीवनावश्यक वस्तूंचा पुरवठा खंडित केला असून, तीन लाख राखीव सैनिक तैनात केले आहेत.

पॅलेस्टिनींना अत्यावश्यक सेवा पुरवणाऱ्या संयुक्त राष्ट्रांच्या मदत कार्य संस्थेनं जवळजवळ ३७ लाख नागरिकांना आश्रय दिल्याचं संयुक्त राष्ट्रांचे

महासचिव अँटोनियो गुटेरस यांनी म्हटलं आहे. संघर्षग्रस्त भागात लहान मुलं आणि कुटुंबांना जीवनावश्यक सेवा पुरवणाऱ्या कार्यकर्त्यांना सुरक्षित मार्ग उपलब्ध करून देणं आवश्यक असल्याचं संयुक्त राष्ट्रांच्या युनिसेफ या संघटनेनं म्हटलं आहे.

अमेरिका, फ्रान्स, जर्मनी, ब्रिटन आणि इटलीनं काल संयुक्त निवेदन प्रसिद्ध करून इस्त्राईलला पाठिंबा दिला आहे. हमास या दहशतवादी संघटनेनं इस्त्राईलवर केलेल्या हल्ल्याचा या देशांनी तीव्र निषेध केला आहे.

**<><><><><><>**

सिक्कीममधल्या मंगन, नागा आणि चुंगथांग या पूरग्रस्त भागाची पाहणी करण्यासाठी आज आंतर-मंत्रालयीन गट भेट देणार आहे. या गटानं काल गंगटोक आणि पाक्योंग जिल्हा आणि फिदांग, लोअर झोंगू इथल्या पूरग्रस्त भागाला भेट दिली. तसंच माज़ीगाव इथल्या शिबिराला भेट देऊन तिथल्या मदत कार्याचा आढावा घेतला.

दरम्यान, सिक्कीममध्ये ढगफुटीमुळे आलेल्या पुरात मृत्युमुखी पडलेल्यांची संख्या 36 वर पोहोचली असून, यामध्ये लष्कराच्या १० जवानांचा समावेश आहे. तसंच ८० जण अद्याप बेपत्ता असल्याचं राज्य आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणानं स्पष्ट केलं आहे.

**<><><><><><>**

भारत-आणि टांझानिया दरम्यानचे संबंध बळकट करण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावल्याबद्दल टांझानियाच्या राष्ट्रपती डॉ. सामिया सुलुहू हसन यांचा आज जवाहरलाल नेहरू विद्यापीठानं ‘मानद डॉक्टरेट’ पदवी प्रदान करून गौरव

केला. “परदेशात झालेला हा आपला पहिलाच सन्मान असून तो कायम लक्षात राहील’, अशा शब्दात डॉ. सामिया यांनी कृतज्ञता व्यक्त केली.

**<><><><><>**

आयसीसी क्रिकेट विश्वचषक 2023 मध्ये, इंग्लंड आणि बांगलादेश यांच्यातला सामना हिमाचलप्रदेशमध्ये धरमशाला इथं आज सकाळी सुरु झाला. बांगलादेशनं नाणेफेक जिंकून क्षेत्ररक्षणाचा निर्णय घेतला.

शेवटची बातमी मिळाली तेव्हा इंग्लंडच्या २ गडी बाद २८३ धावा झाल्या होत्या.

हैदराबादमध्ये दुपारी 2 वाजता पाकिस्तानची श्रीलंकेशी लढत होणार आहे. श्रीलंकेनं नाणेफेक जिंकून फलंदाजीचा निर्णय घेतला.

**<><><><><>**

दिल्लीतल्या मद्यविक्री धोरण घोटाळ्याचा निषेध करत भाजपा कार्यकर्त्यांनी आज निदर्शनं केली. मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांच्या राजीनाम्याची मागणी करणारे फलक कार्यकर्त्यांनी झळकावले.

**<><><><><>**

जम्मू-काश्मीरमधील शोपियां भागात सुरक्षादलांबरोबरच्या चकमकीत आज सकाळी दोन अतिरेकी मारले गेले. त्यांची ओळख पटली असून ते लष्करे तैयबा संघटनेचे आहेत. मोरिफत मकबूल आणि अबरार अशी त्यांची नावं आहे.

**<><><><><>**

आदिवासी विकास मंत्री, तसंच भारतीय तिरंदाजी संघटनेचे अध्यक्ष अर्जुन मुंडा यांनी आज आशियाई क्रीडा स्पर्धेतल्या विजयाबद्दल भारतीयच तिरंदाजी संघ,

प्रशिक्षक आणि सहाय्यक कर्मचाऱ्यांचा सत्कार केला. नुकत्याच झालेल्या या स्पर्धेत भारतीय तिरंदाजी संघानं नऊ पदकांची कमाई केली होती. भारतीय तिरंदाजी संघातल्या १६ खेळाडूंनी सांघिक आणि वैयक्तिक स्पर्धेत पदकं जिंकून ऐतिहासिक कामगिरी नोंदवली आहे, असं अर्जुन मुंडा यांनी यावेळी सांगितलं.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आज नवी दिल्लीत आशियाई क्रीडा स्पर्धेत सहभागी खेळाडूंची भेट घेणार आहेत आणि त्यांच्याशी संवाद साधणार आहेत.

**//<><><><><><>//**